**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 08.09.2024** **वार – रविवार**

---

**मुख्यमंत्री**

राज्यात वारकरी संप्रदायाने समाज घडविण्याचे फार मोठे कार्य केले आहे अस प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज आळंदी इथ व्यक्त केल.

आळंदी मधल्या फ्रुटवाले धर्मशाळा इथ ह.भ.प मारोती महाराज कुऱ्हेकर यांच्या ९३ व्या वाढदिवसानिमित्त आणि ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते कुऱ्हेकर महाराज यांना शांतीब्रह्म पुरस्कार आणि ह.भ.प. ढोक महाराज यांना तुलसीदास पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**बीसीजी लस**

पुणे जिल्हयात क्षयरोगाचे उच्चाटन करण्यासाठी जिल्हयातील १८ वर्षावरील नागरिकांना आता बीसीजीची लस देण्यात येणार आहे. त्यासाठी लसीकरण मोहिमेला सुरू झाली असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर सचिन देसाई आणि क्षयरोग अधिकारी डॉक्टर विकास वडगाये यांनी दिली. पुणे जिल्हयातील सात लाख ५० हजार ७०४ जणांची नोंद करण्यात आली. यामध्ये चार लाख ३२ हजार २३२ जणांना लस घेण्यासाठी संमती दिली आहे. लहान मुलांना दिली जाणारी बीसीजी लस क्षयरोगासह इतर आजारांविरोधातही परिणामकारक ठरल्याचे संशोधनातून सिध्द झाले आहे. त्यानुसार

आता राज्यात पात्र नागरिकांचे लसीकरण करण्याची मोहिम आरोग्य विभागाने आखली आहे. त्यासाठी विशेष लसीकरण सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे,असही देसाई यांनी सांगितल.

**कर्ज योजना**

शेतमाल तारण कर्ज योजनेमुळे राज्यातील शेतमालास वाढीव बाजारभाव मिळाल्यामुळे त्याचा मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदा शेतकऱ्यांना होत आहे. शिवाय बाजार समित्यांच्या उत्पन्नातही वाढ होत असल्याने या योजनेस शेतकरी आणि बाजार समित्यांकडून वाढता प्रतिसाद मिळत आहे.

राज्य कृषी पणन मंडळाच्या 2023- 24 या संपणाऱ्या हंगामामध्ये राज्यातील 67 बाजार समित्यांनी शेतमाल तारण कर्ज योजनेत सहभाग घेतला. त्यामध्ये सुमारे दोन लाख 77 हजार क्विंटलपेक्षा जास्त शेतमाल तारणात स्वीकारला. त्यावर एकूण 36 कोटी 34 लाख 24 हजार रुपयांइतक्या कर्जाचे वाटप शेतकऱ्यांना करण्यात आले आहे. गतवर्षी योजनेत प्रामुख्याने भात, मका, हरभरा व तूर या पिकांसह एकूण 17 शेतमालांवर कर्जवाटप करण्यात आले.

**अथर्वशीर्ष पठण**

महिलांनी आपली शक्ती जागृत करायला हवी, असं प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक  डॉ.अरुणा ढेरे यांनी केलं. त्या आज पुण्यात श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्यावतीनं आयोजित अथर्वशीर्ष पठण सोहळ्यात बोलत होत्या. ऋषीपंचमीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात सुमारे ३५ हजार महिलांनी एकत्र येत आज सकाळी सामुहिक अथर्वशीर्ष पठण केलं

ऋषिपंचमीनिमित्त आज विविध संस्था संघटनांच्या वतीन ऋषि तुल्य व्यक्तींचा सत्कार करण्यात येत आहे.

तसच आज दीड दिवसाच्या गणपती बाप्पाच विसर्जन होत असून , त्यासाठी महापालिकेने विविध शाळांमध्ये कृत्रिम हौदासह सर्व व्यवस्था केली आहे

३६व्या पुणे फेस्टिव्हलमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही 'पुणे फेस्टिव्हल गोल्फ कप स्पर्धा आज झाली. पुण्यातील येरवडा इथ 'पुणे गोल्फ कोर्स' मध्ये सकाळी ६.३० वाजता स्पर्धेला सुरुवात झाली. या स्पर्धेत १३० स्पर्धकांनी भाग घेतला. यामध्ये पुणे परिसरातील विविध कंपन्यांचे वरिष्ठ व्यवस्थापक तसच पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनीही सहभाग घेऊन गोल्फ खेळण्याचा आनंद लुटला.

संवाद, पुणे आणि प्रबोधन विचारधारा यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १४ ते १६ सप्टेंबर दरम्यान कोथरूड गणेश फेस्टिवलचे आयोजन करण्यात आल आहे. मराठी नाटकाचा प्रयोग, मराठी कविसंमेलन आणि गायक, संगीतकार सुधीर फडके यांच्या अलौकिक प्रतिभेच्या विविध पैलूंवरील आधारित 'सत्य शिवाहून सुंदर हे!' अशा अनोख्या कार्यक्रमांची पर्वणी रसिकांना मिळणार आहे. हा फेस्टिवल कोथरूडमधील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात होणार आहे.

<u>बाजारभाव</u>

गुलटेकडी इथल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून ऐंशी ट्रक फळभाज्यांची आवक झाली

पावसाचा फटका पालेभाज्यांना बसला असून जवळपास सर्वच पालेभाज्यांचे भाव कडाडले आहेत. किरकोळ बाजारात चांगल्या प्रतीच्या कोथिंबिरीची भाव प्रतिजुडी 80 ते 90 रुपयांच्या घरात गेला आहे. गणेशोत्सवामुळे फळ आणि फुलांचे भाव दहा टक्क्यांनी वाढले आहे.

<u>स्पर्धा</u>

चौथ्या हॉकी इंडिया वरिष्ठ पुरुष आंतरविभागीय राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा पुण्यात सुरू आहे. स्पर्धेत सकाळच्या सत्रात झालेल्या सामन्यात पेट्रोलियम स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड संघाने थेट कर संकलन केंद्रीय मंडळ संघावर 5-4 अशी मात करत विजयी आगेकूच कायम राखली. अन्य दुसऱ्या सामन्यात रेल्वे संघाने स्टील प्लांट क्रीडा मंडळ संघावर 3-0 अशी एकतर्फी मात करत संघाचा विजय साकार केला.

पुणे आणि परिसरात आज तापमान २९ अंश सेल्सिअस होत अधून मधून पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या उद्याही आकाश ढगाळ राहील तसच हलक्या पावसाची शक्यता असून , घाट परिसरात जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**